6N.A.0704(Legal)

6

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे- ४०१ १०१

जा.क्र.मिभा/मनपा/नर/ ६०२/०७-०८ दिनांक- ७/६/५/२००७

प्रति,
जमीन/जागामालक - मे. दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कं.
अधिकार पत्रधारक - श्री. श्यामसुंदर आर. अग्रवाल
द्वारा- वास्तुविशारद - मेसर्स अनिष ॲन्ड असो.

विषय- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - भाईंदर सर्वे क्र./ हिस्सा क्र. नविन २३७ जुना ६६३ या जागेत नियोजित बांधकाम करण्यासाठी जागेस अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांना सादर करणेसाठी नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ- १.आपला दि.१६/०४/२००७ चा अर्ज.
२.मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टी.ए/एटीपी/प्रमाणपत्र/२०००, दि.३०/१०/२००० ची मंजुरी.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील मौजे - भाईंदर सर्वे.क्र./हिस्सा.क्र. नविन २३७ जुना ६६३ मधील जागेस अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावयाच्या नकाशास खालील अटीस अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) विषयांकित जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून अकृषिक परवानगी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ (प्रकरण १२ सह) विहीत नमुन्यात बांधकाम प्रारंभपत्रासाठी अर्ज करण्याची व बांधकाम प्रारंभपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी आपणांवर राहील. सदर नाहरकत दाखल्याची मुदत एक वर्षासाठी आहे. सदर नाहरकत दाखल्याच्या आधारे जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही, अन्यथा बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनाधिकृत ठरवुन विहीत कार्यवाही करण्यात येईल.

२) सि.आर.झेड. ने बाधीत पोहोंच रस्त्याबाबत आवश्यक असणारी मा. शासनाची परवानगी बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी सादर करणे बंधनकारक राहिल.

३) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी अग्निशमन विभागाकडील कॅपिटेशन फीजचा भरणा करुन नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

४) आपण सादर केलेले दि.१८/०४/२००७ च्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

५) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी अधिकार सोडलेली (Release Deed) नोंदणीकृत करुन सादर करणे बंधनकारक राहिल.

६) जागेच्या मालकीहक्काबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास त्याचे निवारण करण्याची सर्वस्वी जबाबदारी विकासक / वास्तुविशारद यांची संयुक्तीक राहील. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका